

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन करताना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.



शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा सत्कार करताना प्राचार्य अनिल पाटील.

---

इचलकरंजी समाचार गुरुवार दि. ०७-१२-२०२३

# सुदृढ बनण्यासाठी क्रीडा स्पर्धा महत्त्वाच्या - प्राचार्य साळुंखे



इचलकरंजी, दि. ४ – राजर्षी शाहू महाराज आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा वारसा जोपासत विद्यार्थ्यांनी ज्ञान, विज्ञान, संस्काराबरोबरच एखादा खेळ किंवा कला जोपासायला हवी. तरच मन आणि मनगट सुदृढ बनते. त्यासाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे मत स्वामी विवेकानंद संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले. येथील एएससी महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित विभागीय बॉक्सिंग स्पर्धेच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

या उद्घाटन कार्यक्रमास प्राचार्य डॉ.एस.एम. मणेर, प्राचार्य डॉ.अनिल पाटील, कन्या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. त्रिशला कदम, डॉ.डी.सी. कांबळे, प्रा.डी.ए. यादव, प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई, प्रा. रोहित शिंगे यांच्यासह प्राध्यापक, खेळाडू, विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंतर पुरुष आणि महिलांच्या विविध गटात स्पर्धा झाल्या. या स्पर्धेतील विजेत्या एकुण ४२ खेळाडूंची इस्लामपूर येथे होणाऱ्या आंतर विभागीय विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यामध्ये पुरुषांच्या ४६ ते ४८ किलो वजनी गटात अजित वालडी, ४८ ते ५१ किलो गटात संदेश काटकर, रेहान शेख, आर्य बुधले, ५१ ते ५४ किलो गटात राज पाटील, सुशांत कारंडे, शिवराज पाटील, ५४ ते ५७ किलो गटात अभिषेक पवार, ५७ ते ६० किलो गटात सौरभ संकपाळ, हिमेश राठोड, सिद्धार्थ गदाणे, ६० ते ६३ किलो गटात आदित्य जाधव, सारंग पाटील, चिन्मय पाटील, . तर महिलांच्या ४५ ते ४८ किलो गटात वैभवी दौलतकर, कृतीका शापुरकर, ऐश्वर्या चंदुरे , ४८ ते ५० किलो गटात सारीका शिंदे, ५० ते ५२ किलो गटात शुभांगी दुडे, ५४ ते ५७ किलो गटात श्रद्धा नलवडे, ऋतुजा देसाई, ५७ ते ६० किलो गटात माहेश्वरी बारटक्के, वैष्णवी तेवरट्टी, श्रृती जाधव, ६६ ते ७० किलो गटात सानिका पाटील, भाग्यश्री दोदले, ७५ ते ८१ किलो गटात रुचा पाटील आणि ८१ हून अधिक किलो गटात अश्विनी इंगळे यांची निवड झाली.






शिवाजी विद्यापीठ अंतरविभागीय योगासन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मा. सुनीलभाऊ पाटील, प्राचार्य अनिल पाटील, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई


'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे
SHIRI SWAMI VIVEKANAND SHIKSHAN SANSTHA, KOLHAPUR
Shivaji University, Kolhapur
INTERZONAL YOGASANA COMPETITION 2023
16th November 2023
Organized by
DATTAJIRAO KADAM ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE, ICHALKARANJI
Dr. Anil Patil
Chairman
Mr. Mujaffar Lagiwale
Secretary
Mr. Vinayak Bhoi
Director Physical Education
Mr. Prashant Kamble
Director Physical Education







शिवाजी विद्यापीठ अंतरविभागीय योगासन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ.



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य एस एम मणेर, मुजफ्फर लगीवले, विनायक भोई,प्रशांत कांबळे व इतर.

# डी. के. ए. एस.सी. च्या खेळाडूंची योगासन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** तमिळनाडू येथे संपन्न झालेल्या साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला योगासन संघाने सुवर्णपदक तर मुलाच्या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावले. या संघात डी.के. ए.एस.सी. कॉलेजच्या खेळाडू कुमारी सानिका जाधव, सन्मती सगरे व ऐश्वर्या पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी करत १२२२.५० इतके गुण मिळवून शिवाजी विद्यापीठ संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. तसेच समीर सरगम याने विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत चतुर्थ क्रमांक पटकावले. या सर्व खेळाडूंची भुवनेश्वर (ओडिसा) इथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सर्व खेळाडूंना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर यांचे प्रोत्साहन लाभले तर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत शुक्रवार ८ डिसेंबर २०२३



तमिळनाडू : येथे साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर, प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई व प्रशांत कांबळे.

# डीकेएएससीचे साऊथ वेस्ट झोन योगासन स्पर्धेत सुवर्ण

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

तमिळनाडू येथे झालेल्या साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला योगासन संघाने सुवर्णपदक तर मुलाच्या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावले.

या संघात डीकेएएससी कॉलेजच्या खेळाडू सानिका जाधव, सन्मती सगरे व ऐश्वर्या पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी करत १२२२.५० इतके गुण मिळवून शिवाजी विद्यापीठ संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. तसेच समीर सरगम याने विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत चतुर्थ क्रमांक पटकावले. या सर्व खेळाडूंची भुवनेश्वर (ओडिसा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंना प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर यांचे प्रोत्साहन लाभले. जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

दक्षिण महाराष्ट्र केसरी ८ डिसेंबर २०२३/१०



विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य एस एम मणेर, मुजफ्फर लगीवले, विनायक भोई,प्रशांत कांबळे व इतर.

# डी. के. ए. एस.सी. च्या खेळाडूंची योगासन स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी** : तमिळनाडू येथे संपन्न झालेल्या साऊथ वेस्ट झोन आंतर विद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला योगासन संघाने सुवर्णपदक तर मुलाच्या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावले. या संघात डी.के. ए.एस.सी. कॉलेजच्या खेळाडू कुमारी सानिका जाधव, सन्मती सगरे व ऐश्वर्या पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी करत १२२२.५० इतके गुण मिळवून शिवाजी विद्यापीठ संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे. तसेच समीर सरगम याने विद्यापीठ संघाचे प्रतिनिधित्व करत चतुर्थ क्रमांक पटकावले. या ·सर्व खेळाडूंची भुवनेश्वर (ओडिसा) इथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सर्वखेळाडूंनामहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मनेर यांचे प्रोत्साहन लाभले तर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.






प्रतिक मगदुम याला सुवर्ण पदक मिळाल्याबद्दल प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# प्रतिक मगदूम याला ज्युनिअर मिस्टर इंडिया किताब

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** येथील डी.के.ए.एस.सी. कॉलेज इचलकरंजी चा खेळाडू प्रतिक मधुकर मगदुम याने चेन्नई येथे झालेल्या ज्युनिअर मिस्टर इंडिया बॉडि बिल्डिंग स्पर्धेत ६० किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावले. या स्पर्धेसाठी देशभरातून खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. प्रतिक याने ६० किलो वजनी गटात एकूण ५० खेळाडूंना मात देत सुवर्ण पदकावर शिक्कामोर्तब केले व ज्युनिअर मिस्टर इंडिया हा किताब पटकवला. प्रतिक हा नागेश सुतार यांच्या मागदर्शनाखाली सराव करतो. त्याला प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच पै. अमृत भोसले, डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. डी. ए. यादव आदिंनी शुभेच्छा दिल्या. प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



प्रतीक मंगदुम – अखिल भारतीय अंतरविद्यापीठ शरीर सौष्टव स्पर्धेत कास्य पदक.



# ए.एस.सी.च्या प्रतिक मगदुमला कांस्यपदक

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

डि. के. ए. एस. सी. कॉलेजचा खेळाडू प्रतीक मगदूम याने कालिकत विद्यापीठ, केरळ या ठिकाणी संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेत ६० किलो वजनी गटात कास्य पदकावर शिक्कामोर्तब केले. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांचे प्रोत्साहन लाभले प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल प्रतिक मगदूम याचे सर्व स्थरातून अभिनंदन होत आहे.

महान कार्य
मार्गशीर्ष कृ.१३ ज्येष्ठा
दि. ९ जानेवारी २०२४



# प्रतिक मगदूम याची आंतर विद्यापीठ शरीरसौष्ठव स्पर्धेसाठी निवड

इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के.ए. एस. सी. कॉलेज इचलकरंजी चा खेळाडू कु. प्रतिक मधुकर मगदूम याने शहाजी कॉलेज, कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय शरीर सौष्ठव स्पर्धेत ६० किलो खालील वजनी गटात उत्तम शरीर यष्टीचे प्रदर्शन करून सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला. या गटात एकूण २३ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. या २३ स्पर्धेकातून प्रतीक मगदूम याने सुवर्ण पदक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेच्यात मानाचा तुरा रोवला आहे.

प्रतिक याची कालीकत येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ शरीर सौष्ठव स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. प्रतिक हा एन. एस. फिटनेस जीम मध्ये नागेश सुतार यांच्या प्रशिक्षणाखाली पुढील स्पर्धेची तयारी करत आहे. या खेळाडूस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एम. मणेर यांनी प्रोत्साहन देऊन पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner



गौरी लायकर & प्रज्ञा कोंडूगळे- महाराष्ट्र राज्य अंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव खो-खो स्पर्धेत सुवर्ण पदक



प्रणव रावळ – तलवारबाजी क्रीडा प्रकारात शिवाजी विद्यापीठ संघात निवड.

महान कार्य | मार्गशीर्ष कृ.८ हस्त
दि. ४ जानेवारी २०२४



# डी.के.ए.एस.सी. कॉलेजच्या खेळाडुचे तलवारबाजीत यश

इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के.ए. एस. सी. कॉलेजचा खेळाडू कु. प्रणव प्रकाश रावळ याने औरंगाबाद येथे साऊथ वेस्ट झोन इन्टर युनिव्हर्सिटी तलवारबाजी स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी करून शिवाजी विद्यापीठ संघाला इप्पी या प्रकारात ब्रॉन्झ मेडल मिळवून दिले आहे.

प्रणव रावळ याची अमृतसर येथे होणाऱ्या ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर सर यांचे प्रोत्साहन लाभले. तर महाविद्यालयाचे जिमखाना प्रमुख मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner



## डी.के.ए.एस.सी. कॉलेजच्या खेळाडुचे तलवारबाजीत यश

**इचलकरंजी /महान कार्य वृत्तसेवा**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के.ए. एस. सी. कॉलेजचा खेळाडू कु. प्रणव प्रकाश रावळ याने औरंगाबाद येथे साऊथ वेस्ट झोन इन्टर युनिव्हर्सिटी तलवारबाजी स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी करून शिवाजी विद्यापीठ संघाला इप्पी या प्रकारात ब्रॉन्झ मेडल मिळवून दिले आहे.

प्रणव रावळ याची अमृतसर येथे होणाऱ्या ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या खेळाडूस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर सर यांचे प्रोत्साहन लाभले. तर महाविद्यालयाचे जिमखाना प्रमुख मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



**इचलकरंजी : ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल प्रणव रावळ याचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.**

## ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी प्रणव रावळची निवड

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के. ए. एस. सी. कॉलेजचा खेळाडू प्रणव प्रकाश रावळ याने औरंगाबाद येथे झालेल्या साऊथ वेस्ट झोन इन्टर युनिव्हर्सिटी तलवारबाजी स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी करून शिवाजी विद्यापीठ संघाला इप्पी या प्रकारात ब्रॉन्झ मेडल मिळवून दिले आहे. प्रणव रावळ याची अमृतसर येथे होणाऱ्या ऑल इंडिया इन्टर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याला प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांचे प्रोत्साहन लाभले. मुजफ्फर लगीवाले, विनायक भोई, प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



प्रणाली कोपार्डे & प्रिया चव्हाण – कयाकिंग & कनोईंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड



सकाळ कोल्हापूर, गुरुवार, २८ मार्च, २०२४

इचलकरंजी : कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल प्रिया चव्हाण, प्रणाली कोपार्डे यांचा सत्कार प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी केला.

## प्रिया चव्हाण, प्रणाली कोपार्डे यांची विद्यापीठ संघात निवड

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २७ : डीकेएएससी महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली.

प्रिया चव्हाण व प्रणाली कोपार्डे अशी त्यांची नावे आहेत. स्पर्धा पंजाब युनिव्हर्सिटी, पटियाला येथे होतील. प्रिया चव्हाणने सांगलीतील आंतरविभागीय कनोईंग स्पर्धेत सी १ - २०० मी., ५०० मी. प्रकारात सुवर्णपदक पटकावले. प्रणाली कोपार्डे हिने कयाकिंग स्पर्धेत के१-२०० मी., ५०० मी. प्रकारात सुवर्णपदक मिळवले. सत्कार प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी केला. शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रा. प्रशांत कांबळे, गणेश बरगाले यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner



प्रिया चव्हाण व प्रणाली कोपार्डे यांचा निवडीनंतर सत्कार करण्यात आला.

# डीकेएएससी च्या खेळाडूंची आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित डी. के. ए. एस. सी. कॉलेज इचलकरंजीच्या खेळाडू प्रिया चव्हाण व प्रणाली कोपार्डे यांची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग स्पर्धेसाठी शिवाजी संघात निवड झाली आहे. या स्पर्धा पंजाब युनिव्हर्सिटी, पटियाला येथे दि. १९ ते २२ मार्च २०२४ दरम्यान येथे होणार आहेत. प्रिया चव्हाण हीने सांगली येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय कनोईंग स्पर्धेत C१– २०० मी. व ५०० मी. प्रकारात सुवणे पदक पटकवले होते. तर प्रणाली कोपार्डे हिने कयाकिंग स्पर्धेत K१– २०० मी. व ५०० मी. प्रकारात सुवर्ण पदक पटकाविले होते. यांना गणेश बरगाले यांचे मार्गदर्शन मिळाले. प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. तसेच शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



# एएससीच्या दोन खेळाडूंची शिवाजी विद्यापीठ संघात निवड

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित डि. के. ए. एस. सी. कॉलेज इचलकरंजी च्या खेळाडू कू. प्रिया मारुती चव्हाण व प्रणाली प्रमोद कोपार्डे यांची पंजाब युनिव्हर्सिटी, पटियाला येथे येथे संपन्न होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग स्पर्धेसाठी शिवाजी संघात निवड झाली आहे. प्रिया चव्हाण याने सांगली येथे संपन्न झालेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय कनोईंग स्पर्धेत सी १– २०० मी. व ५०० मी. प्रकारात सुवणे पदक पाकावले होते तर प्रणाली कोपार्डे हिने कयाकिंग स्पर्धेत के१– २०० मी. व ५०० मी. प्रकारात सुवर्ण पदक पटकाविले होते. या दोन्ही खेळाडू गणेश बरगाले यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात. या खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांनी सत्कार करून पुढिल स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयांचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. सदर विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



रामानुज सिंग & युवराज कदम – अंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत रौप्य पदक

तरुण भारत
शुक्रवार १५ डिसेंबर २०२३

# डीकेएएससीच्या खेळाडूंचे आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत यश

इचलकरंजी : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स, अँड कॉमर्स कॉलेजच्या खेळाडूंनी इस्लामपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत उत्कृष्ठ कामगिरी करत यश संपादन केले आहे. यामध्ये ६२ ते ६५ किलो वजनी गटात युवराज कदम व ८६ ते ९२ किलो वजनी गटात रामानुज सिंग याने रौप्य पदक प्राप्त केले. त्यांना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांचे प्रोत्साहन लाभले. जिमखाना विभाग प्रमुख प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



इचलकरंजी : आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत यश मिळवलेल्या डीकेएएससी महाविद्यालयाच्या खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.



अखिल भारतीय अंतरविद्यापीठ कयाकिंग & कनोईंग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झालेले महाविद्यालयाचे खेळाडू.



शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय कुस्ती स्पर्धेत महविद्यालयचे विजयी मल्ल.



शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय कबड्डी स्पर्धेत महविद्यालायचा विजयी संघ



शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर विभागीय खो-खो स्पर्धेत महविद्यालायचा विजयी संघ



इचलकरंजी : आदित्य शेळके यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर.

# आदित्य शेळके यांची खो–खो स्पर्धेसाठी निवड

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे डी. के. ए. एस. सी. कॉलेज इचलकरंजी चा खेळाडू आदित्य शेळके याची पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खो–खो सर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात निवड झाली आहे. या स्पर्धा दि. १९ ते २३ जानेवारी २०२४ रोजी नांदेड येथे होणार आहेत. तसेच आदित्य याची ओडिशा येथे झालेल्या अल्टिमेट खो–खो लिगसाठी राजस्थान संघाने दिड लाख रु. इतकी बोली लावून संघात निवड केली होती. या खेळाडूस प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांचे प्रोत्साहन व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई व प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

---

सकाळ, मंगळवार, २३ जानेवारी, २०२४

# 'डीकेएएससी' सलग दुसऱ्यांदा विजेता

## अभय चषक स्टाफ क्रिकेट स्पर्धा : राज्यातील ३२ संघांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. २२ : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित अभय चषक स्टाफ क्रिकेट स्पर्धेमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाने सलग दुसऱ्या वर्षी अजिंक्यपद पटकावले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त स्पर्धा कोल्हापूरमधील रुईकर कॉलनी मैदान व मेरी वेदर ग्राउंडवर झाली. स्पर्धेत संस्थांतर्गत राज्यभरातील एकूण ३२ संघांनी सहभाग घेतला होता.

आर्टस्‌ कॉमर्स कॉलेज नागठाणे, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय धाराशीव, स्वामी विवेकानंद संस्था कॅम्पस व एलबीएस महाविद्यालय सातारा या संघांवर मात करत डीकेएएससी संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला होता. अंतिम सामन्यात विवेकानंद वॉरियर्स या संघाविरूद्ध आठ षटकांत १०२ धावसंख्या उभारून त्यांना ७४ धावसंख्येवर रोखून निर्विवाद विजय मिळवला. संघाला प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते व मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे आदींच्या उपस्थितीत विजयी चषक देण्यात आला. प्रशिक्षक प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, कर्णधार प्रा. विनायक भोई यांनी चषक स्वीकारला. प्रा. मुंजफ्फर लगीवाले यांना मालिकेतील उत्कृष्ट फलंदाज व मालिकावीर पुरस्काराने गौरविले.



कोल्हापूर : अभय चषक क्रिकेट स्पर्धेत डीकेएएससी कॉलेजने अजिंक्यपद मिळवले.

CS Scanned with CamScanner

सकाळ | शनिवार, २४ फेब्रुवारी, २०२४



इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजच्या वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण सोहळ्यात पारितोषिकप्राप्त खेळाडूंसमवेत प्रा. डॉ. विनायक पवार, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, आदी.

# डीकेएएससी महाविद्यालयात क्रीडा पारितोषिक वितरण

इचलकरंजी, ता. २३ : 'महाविद्यालयीन जीवनाचे सोनेरी दिवस प्रत्येकाच्या वाट्याला पुन्हा पुन्हा येत नाहीत. चांगल्या करिअरची स्वप्ने बाळगून अभ्यास करत करत हे दिवस आनंदाने जगायला शिका. अभ्यासाबरोबर एखादी कला, एखादा छंद जोपासायला हवा. चांगली पुस्तके वाचा,' असा मूलमंत्र प्रसिद्ध गीतकार, कवी प्रा. डॉ. विनायक पवार यांनी विद्यार्थ्यांना दिला.

येथील डीकेएएससी महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. समारंभात महाविद्यालयातील सर्व यशस्वी खेळाडूंचा, गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. प्राचार्य डॉ. मणेर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. डी. सी. कांबळे यांनी महाविद्यालयाचा सर्वसाधारण अहवाल, तर प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. विनायक भोई यांनी जिमखाना विभागाचे अहवालवाचन केले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. अतीश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. ए. यादव यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार १९ फेब्रुवारी २०२४

# विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर छंद जोपासायला हवा

## कवी प्रा. डॉ. विनायक पवार : डीकेएएससीमध्ये पारितोषिक वितरण

**प्रतिनिधी**
इचलकरंजी

महाविद्यालयीन जीवनाचे हे सोनेरी दिवस प्रत्येकाच्या वाट्याला परत येत नाहीत. चांगल्या करिअरची स्वप्ने उरात ठेवून अभ्यास करत करत हे दिवस आनंदाने जगायला हवेत. अभ्यासाबरोबर एखादी कला, एखादा छंद जोपासायला हवा. चांगली पुस्तके वाचायला हवीत, असे मत गीतकार, कवी प्रा. डॉ विनायक पवार यांनी व्यक्त केले.


इचलकरंजी : डीकेएएससीच्या पारितोषिक वितरण सोहळ्यात बोलताना प्रा. डॉ. विनायक पवार. समवेत प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर व मान्यवर.

येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर होते. यशस्वी खेळाडूंचा, गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. डॉ. पवार यांनी कविता, चित्रपटगीते आणि अनुभव कथनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

अभ्यासाबरोबर सर्व क्षेत्रात महाविद्यालयाने शहराचे व संस्थेचे नाव उज्वल केले आहे. आम्हाला आमच्या विद्यार्थ्यांचा अभिमान वाटतो, असे प्राचार्य मणेर यांनी गौरवोद्‌गार काढले. शेलापागोटे वाचनाचा कार्यक्रम झाला. कार्याध्यक्ष डॉ. डी. सी. कांबळे यांनी अहवाल, प्रा. मुजफ्फर लगीवाले व प्रा. विनायक भोई यांनी जिमखाना अहवाल वाचन केले. विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर केले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. आभार प्रा. डी. ए. यादव, सूत्रसंचालन प्रा. अतिश पाटील, प्रा. रोहित शिंगे, डॉ. केतकी पाटील यांनी केले.

CS Scanned with CamScanner




दक्षिण महाराष्ट्र केसरी

२४ जून २०२४/५

# डीकेएएससी महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँन्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी या महाविद्यालयामध्ये २१ जून 'आंतरराष्ट्रीय योग दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाच्या एनसीसी व क्रीडा विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात योगा प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी योगासने केली. प्राचार्य डॉ. मणेर यांनी मनोगतामध्ये योगाचे महत्त्व, बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्य व स्वास्थ्य यासाठी योग व प्राणायाम यावर भाष्य करत सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी एनसीसी प्रमुख प्रा. विनायक भोई, क्रीडा संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले यांच्यासह गुरुदेव कार्यकर्ते, प्रशासकीय सेवक, एनसीसी कॅडेट उपस्थित होते. प्रा. विनायक भोई यांनी सर्वांचे आभार मानले.

CS Scanned with CamScanner



GPS Map Camera
Ichalkaranji, Maharashtra, India
MFR2+QF7, behind ASC College, Pujari Mala, Ichalkaranji, Maharashtra 416115, India
Lat 16.691844°
Long 74.451093°
21/06/24 08:55 AM GMT +05:30
Google